दैनिक सकाळ- 28 जुलै, 2024

# क्वीक हिल सायबर वॉरिअर क्लब स्थापन

## विद्यापीठात सायबर सुरक्षेवर होणार काम

जळगाव, ता. २७ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्यातील सामंजस्य करारानुसार क्विक हिल सायबर वॉरिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची स्थापन करण्यात आला आहे.

सायबर सुरक्षेच्या जनजागृती अंतर्गत स्थापन केलेल्या या क्लबमध्ये चार सदस्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यामध्ये अध्यक्ष पायस सावळे, सचिव मयूर बंडे, ॲक्टीव्हीटी डायरेक्टर रेवती फिरके, पीआर डायरेक्टर प्रगती कोल्हे व शिक्षक समन्वयक प्रा. राजू आमले व ३६ स्वयंसेवकची निवड करण्यात आली आहे.

क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या सीनियर एक्झिकेटीव्ह सुगंधा दाणी यांनी या क्विक हिल सायबर वॉरिअर क्लब ऑफ कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सर्व क्लब ऑफिसर्स व सदस्यांना १२ जुलैस ऑनलाइन फाउंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांबद्दल मार्गदर्शन केले. तसेच १५ जुलै शाळा महाविद्यालयातील विविध वयोगटातील विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधावा व समाजातील लोकांना सायबर गुन्ह्याबाबत जागृती कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. त्याचबरोबर २३ जुलैला जळगाव येथील पोलिस विभागातील सायबर सेलचे पीएसआय डिगंबर थोरात, दिलीप चिंचोले व सचिन सोनवणे यांनी स्वयंसेवकांना समाजात कशा प्रकारे गुन्हे घडतात व त्यापासून कसे वाचावे व काय उपाय योजना कराव्या याबद्दल मार्गदर्शन केले. फाउंडेशनचे स्वयंसेवक जळगाव, धुळे, नंदुरबार येथे सायबर सुरक्षा विषयावर जनजागृती करणार आहेत.